www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-210 • Thursday, 04 January 2024 •Pages-04 •Rs.2/-

### अनमोल विचार

"मेहनत नावाचा मित्र सोबत असला की अपयश नावाच्या शत्रूची भीती वाटत नाही."

### लक्षवेधी

#### नाद खुळा... म्हणून झोमॅटो बॉय थेट घोड्यावरून ग्राहकाच्या दारात

**हैदराबाद** : देशभरातील ट्रकचालकांनी बेमुदत संप पुकारल्याने पेट्रोल पंपावर इंधनाचा साठा कमी उपलब्ध झाला. तर, अनेक ठिकाणी पेट्रोल पंप बंद राहणार असल्याची अफवा पसरल्याने बहुतांश पेट्रोल पंपावर वाहनचालकांनी मोठी गर्दी केली होती. दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांनी पेट्रोल पंपावर रांगाच रांगा लावल्या होत्या. यादरम्यान, ऑनलाईन ऑर्डर पाठवणाऱ्या डिलिव्हरी बॉयची चांगलीच पंचाईत झाली. ग्राहकांपर्यंत वेळेत ऑर्डर पोहोचवण्यासाठी त्यांना तारेवरची कसरत करावी लागली. यावेळी, एका झोमॅटो बॉयने चक्क घोड्यावर स्वार होऊन डिलिव्हरी पोहोचवली.

#### काँग्रेस आणि डाव्यांना लुटण्याचे स्वातंत्र्य हवे; पीएम मोदींचा इंडिया आघाडीवर घणाघात

**नवी दिल्ली** : येत्या काही महिन्यात लोकसभा निवडणुका होणार आहेत. यासाठी सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. भाजपचे दक्षिण भारतावर विशेष लक्ष आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी दक्षिण दौऱ्यावर आहेत. दरम्यान, बुधवारी केरळमधून पीएम मोदींनी इंडिया आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. केरळच्या त्रिशूरमध्ये पीएम मोदी म्हणाले की, 'काँग्रेस आणि डाव्यांनी केरळची लूट केली. केरळमध्ये डावे आणि काँग्रेस दीर्घकाळापासून सत्ताधारी आणि विरोधक असल्याचे भासवतात. हे नावाचे दोन पक्ष आहेत. भ्रष्टाचार असो, गुन्हेगारी असो किंवा घराणेशाही असो, हे दोघे मिळून सर्वकाही करतात. आता इंडी अलायन्स स्थापन करून त्यांनी जाहीर केले की, त्यांच्या विचारधारा आणि धोरणांमध्ये कोणताही फरक नाही.'

#### 'यांनी कुस्तीची वाट लावली', आता बजरंग, विनेश आणि साथीविरोधात जंतर-मंतरवर उतरले कुस्तीपटू

**नवी दिल्ली** : गेल्या काही महिन्यांपासून भारतीयकुस्ती महासंघ चर्चेचा विषय ठरला आहे. दरम्यान, भारतीयकुस्ती महासंघाविरोधात आंदोलन करत असलेले कुस्तीपटू बजरंग पूनिया, विनेश फोगाट आणि साक्षी मलिक यांच्याविरोधात आता ज्युनियर कुस्तीपटूंनी दंड थोपटले आहे. शेकडो ज्युनियर कुस्तीपटू हे जंतर-मंतरवर जमा झाले असून, एक महत्त्वाचं वर्ष वाया गेल्याने त्यांनी या वरिष्ठ खेळाडूंविरोधात आंदोलन केले. भारतीय कुस्तीमध्ये सुरू असलेल्या वादादरम्यान, आज ज्युनियर कुस्तीपटू मोठ्या संख्येने जमा झाले. तसेच कारकिर्दीमधील एक महत्त्वाचं वर्ष वाया गेल्याने त्यांनी त्यासाठी बजरंग पूनिया, साक्षी मलिक आणि विनेश फोगाट यांना दोषी ठरवले. उत्तर प्रदेश, हरियाणा आणि दिल्लीतील विविध भागातून बसमध्ये बसून हे कुस्तीपटू जंतर मंतर येथे आले होते.

#### अपघात रोखण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने उचलले कडक पाऊल; 'थेट पालकांनाच होणार शिक्षा'

**लखनौ** - अलिकडे शाळेत शिकणारी मुलेही स्कुटी अथवा तत्सम वाहनाने शाळेत जाताना दिसत असतात. त्यांच्याकडे वाहन चालवण्यासाठी आवश्यक असलेला परवानाही नसतो. तरीही ती बेजबाबदारपणे वाहने चालवत असतात. काहीवेळा एकाच वाहनावर तीन तीन जण बसलेले असतात. त्याहीपुढे म्हणजे धोका पत्करत विविध प्रकारची स्टंटबाजी करत वाहन चालवण्याचेही फॅड निर्माण झाले आहे. अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार रस्ते अपघातात मरण पावलेल्यांमध्ये १८ पेक्षा कमी वय असणाऱ्या मुलांची संख्या अधिक असल्याचे आढळून आले आहे व त्यात मुलींचाही समावेश आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी अर्थात असले अपघात रोखण्यासाठी आता उत्तर प्रदेश सरकारने ठोस पाऊले उचलली आहेत.

#### अयोध्येला जाणाऱ्या लोकांना सरकारने कडक सुरक्षा दिली पाहिजे, अन्यथा.. काँग्रेस नेत्याने व्यक्त केली शंका

**नवी दिल्ली** - अयोध्येत २२ जानेवारी रोजी होणारा प्राणप्रतिष्ठा सोहळा हा एक राजकीय कार्यक्रम असल्याची टीका करतानाच अयोध्येत गोध्रा कांडसारखी घटना होण्याची शंकाही काँग्रेस नेते बी. के. हरिप्रसाद यांनी व्यक्त केली आहे. हरिप्रसाद म्हणाले की राम मंदिराचे उद्घाटन हा काही धार्मिक कार्यक्रम नाही तर तो एक राजकीय कार्यक्रम आहे. तो धार्मिक कार्यक्रम असता तर आम्ही लोकही त्यात सहभागी झालो असतो. धार्मिक कार्यक्रम असता तर गुरू मंडळीही त्यात सहभागी झाली असती.

#### धर्माच्या आधारावर केलेला सीएए कायदा घटनाविरोधी'; ओवेसी यांची फडणवीसांवर टीका

**नवी दिल्ली** - लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर नागरिकत्व दुरुस्ती कायद्यावरून देशातील राजकारण तापत चालले आहे. आता एमआयएम पक्षाचे नेते खासदार असदुद्दीन ओवेसी यांनीही हा कायदा अर्थात सीएए धर्माच्या आधारावर करण्यात आला असून, तो घटनाविरोधी आहे आणि कायद्याचे उल्लंघन करणारा असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच आता देशाच्या संदर्भात त्यांचे धोरण काय आहे ते सांगावे अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, ६ डिसेंबर १९९२ रोजी कारसेवकांनी जेंव्हा बाबरी मशिद पाडली त्यावेळी आपण तेथे उपस्थित होतो.

#### गोव्यात आयकर विभागाकडून पब, हॉटेल्स आणि उपाहारगृहे यांवर धाडी

**पणजी** : नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर गोव्यात होणारी पर्यटकांची गर्दी आणि त्यामुळे येथील हॉटेल आस्थापने, पब, उपाहारगृहे यांमध्ये होणारी उलाढाल लक्षात घेऊन आयकर विभागाने गोव्यातील पब, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट आदींवर धाडी घातल्या आहेत. बेंगळुरूहून आयकर विभागाचे अधिकारी गोव्यात आले असून त्यांनी २ जानेवारीला सायंकाळपासून एकाच वेळी राज्यातील ७ आस्थापनांच्या ५ ते ७ शाखांवर धाडी घातल्या. गोव्यात कळंगुट, वागातोर, बागा, मोरजी, हरमल, कांदोळी, कोलवा, बेतालभाटी या समुद्रकिनारी भागांतील हॉटेल, पब, रेस्टॉरंट यांमध्ये मोठ्या प्रमाणात उलाढाल होते.

# 'मुंबई-गोवा महामार्गाचे काम ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करा, अन्यथा अवमान कारवाई होणार' उच्च न्यायालयाचे निर्देश



### मुंबई-गोवा एनएच-६६ हा महामार्ग...

मुंबई-गोवा एनएच-६६ या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम रखडले असून महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य असल्याचा दावा करणारी जनहित याचिका कोकणस्थित वकिलाने दाखल केली होती. त्यावर, २०२२ अखेरीस या महामार्गाचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन राज्य सरकार आणि एनएचएने न्यायालयाला दिले होते. त्यामुळे, न्यायालयाने याचिका निकाली काढली होती. त्यानंतरही हे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे, याचिकाकर्त्याने या प्रकरणी अवमान याचिका केली होती. न्यायालयाने दिलेल्या आदेशांची पूर्तता न केल्यामुळे याचिकाकर्त्यांना वारंवार न्यायालयात याचिका करावी लागत असल्याची टिपण्णी करून याचिकाकर्त्यांना झालेल्या त्रासासाठी ५० हजार रुपये देण्याचे आदेश याआधी न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारला दिले होते.

**■मुंबई । यश सावंत,**

गेल्या १३ वर्षांपासून रखडलेल्या मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदीकरणाचे कामासाठी आणखी एक वर्षाचा कालावधी लागणार असल्याबाबत उच्च न्यायालयाने बुधवारी नाराजी व्यक्त केली. त्याचवेळी, या महामार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी न्यायालयाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचए) आणि राज्य सरकारला डिसेंबर अखेरीपर्यंतची मुदत देऊन ही शेवटची संधी असल्याचे बजावले. डिसेंबर अखेरीपर्यंत या महामार्गाचे काम पूर्ण करण्यात दोन्ही यंत्रणा अपयशी ठरल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल व त्यासाठी संबंधितांवर अवमान कारवाई केली जाईल, असा इशाराही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने एनएचए आणि राज्य सरकारला दिला. त्याचवेळी, या प्रकरणी दाखल केलेली जनहित याचिका आणि अवमान याचिका निकाली काढली.

महामार्गाच्या चौपदीकरणाचे काम २०११ मध्ये हाती घेण्यात आले. हे काम डिसेंबर २०२० मध्ये पूर्ण करण्याची हमी दोन्ही यंत्रणांनी २०१७ मध्ये दिली होती. तथापि, काम पूर्ण करण्याचे आश्वासन देऊन आणि न्यायालयाकडूनही वारंवार त्यासाठी संधी देऊनही महामार्गाच्या चौपदीकरणाचे काम पूर्ण झालेले नाही याकडे याचिकाकर्त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. आता हे काम डिसेंबर २०२४ पर्यंत करण्याची नवी हमी एनएचए आणि राज्य सरकारकडून देण्यात येत आहे. केवळ हमी देण्याशिवाय दोन्ही यंत्रणांनी काहीच केले नाही, असेही याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे, दहा टप्प्यांत या महामार्गाचे काम केले जात असून पहिले दोन टप्प एनएचएतर्फे, तर उर्वरित टप्प्यांचे काम राज्य सरकारकडून केले जात आहे. संपूर्ण महामार्गाचे काम डिसेंबरअखेरीपर्यंत करण्याचे आश्वासनही एनएचएतर्फे वरिष्ठ वकील केविक सेटलवाड यांनी न्यायालयाला दिले. तर, दहा भागांपैकी तीन भागांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित भागांचेही काम वर्षाअखेरीस पूर्ण केले जाईल, असे सरकारी वकील प्रियभूषण काकडे यांनीही न्यायालयाला सांगितले.

मुख्य न्यायमूर्ती उपाध्याय यांनी मात्र दोन्ही यंत्रणांच्या दाव्यांबाबत नाराजी व्यक्त केली. प्रकल्पाचे काम सुरू होऊन १३ वर्षे उलटली आहेत. त्यानंतरही महामार्गाच्या चौपदीकरणाचे आणि दुरुस्तीची कामे पूर्ण झालेली नाहीत. अशा प्रकल्पांमध्ये होणारा विलंब आणि त्यामुळे वाढत जाणारा बांधकाम खर्चाचा भार जनतेला आणि सरकारी तिजोरीलाच सोसावा लागतो, अशा शब्दांत न्यायालयाने दोन्ही यंत्रणांच्या निष्क्रियेवर ताशेरे ओढले. अमूक कालावधीत महामार्गाचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन सरकार आणि एनएचएआयकडून दिले गेले. प्रत्यक्षात त्याची पूर्तता केलीच गेली नाही. त्यामुळे, यापुढे दिलेल्या मुदतीत महामार्गाचे काम पूर्ण करण्यात विलंब झाल्यास तो न्यायालयाचा अवमान केल्यासारखे असेल आणि न्यायालय त्याची गंभीर दखल घेईल, असा इशारा न्यायालयाने दिला.

**न्यायालयाची मिश्किल टिप्पणी**

महामार्गाचे काम ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण होईल असे आश्वासन सरकार आणि एनएचएआयने दिल्यानंतर, १ जानेवारी २०२५ रोजी राज्य सरकारने व्होल्वो बस अथवा लिमोझिनने आम्हा सगळ्यांना याच महामार्गाने गोव्याला घेऊन जावे, अशी मिश्किल टिप्पणी मुख्य न्यायमूर्तींनी केली. त्यांच्या या टिप्पणीवर न्यायदालनात एकच हशा पिकला.

## सावित्रीबाई फुले यांच्या जन्मभूमीत भव्य स्मारक उभारणार, १० एकर जमीन खरेदी,१०० कोटींचा खर्च करणार: एकनाथ शिंदे



**■सातारा। सचिन कदम,**

थोर समाजसुधारक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव या जन्मगावी लोकांनी येऊन सामाजिक परिवर्तनासाठी ऊर्जा घ्यावी. यासाठी दहा एकर जागा शासन खरेदी करेल आणि त्यावर शंभर कोटी रुपये निधी खर्चून भव्य स्मारक उभारेल. सावित्रीबाई फुले यांचे कर्तुत्व, त्याग, योगदानाची माहिती समाजातील प्रत्येक घटकाला व्हावी, यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न शील राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

सावित्रीबाई फुले यांचा १९३ वा जयंती सोहळा महाराष्ट्र शासन आणि सातारा जिल्हा परिषदेतर्फे नायगाव (ता. खंडाळा) येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत साजरा झाला. यावेळी अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, उत्पादन शुल्कमंत्री आणि पालकमंत्री, सातारा व ठाणे जिल्हा शंभूराज देसाई, गृहनिर्माण, इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, माजी मंत्री महादेव जानकर, नरेंद्र पाटील, आ. मकरंद पाटील, आ. जयकुमार गोरे, आ. महेश शिंदे, पुरुषोत्तम जाधव आदी उपस्थित होते. महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले देशाला लाभलेले वरदान आहेत. स्त्री स्वातंत्र्य हा शब्दही माहीत नसलेल्या काळात त्यांनी स्त्री शिक्षणाची क्रांती केली. समाजाला जगण्याची दिशा दिली. त्यांच्यासमोर नतमस्तक झाल्याने सामाजिक कार्यासाठी ऊर्जा मिळते. माज्यासाठी ते ऊर्जादायी आहे, अशा शब्दात सावित्रीबाई फुले यांना मुख्यमंत्री शिंदे यांनी अभिवादन केले.

## 'महाराष्ट्राची ओळख पुसून टाकण्याचा डाव, आता महानंद प्रकल्प गुजरातला हलवण्याची तयारी'



**■मुंबई । विशाल कारंडे,**

महानंदा डेअरी गुजरातला नेण्याचा डाव असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. महानंदा ही महाराष्ट्राची ओळख आहे, ती ओळख पुसून टाकली जातेय यामागे कोण आहे? महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना हा भ्रष्टाचार घोटाळा दिसून येत नाही का...? असा सवाल विचारत महानंद नेण्याचा प्रयत्न केल्यास शिवसेना गप्प बसणार नाही असा इशारा राऊतांनी दिलाय. राज्यातील प्रमुख उद्योग आणि व्यवसाय गुजरातला हलवल्यानंतर आता महाराष्ट्राचा प्रमुख महानंद डेअरी प्रकल्प राष्ट्रीय डेअरी डेव्हलपर बोर्डाच्या हवाली करून गुजरातच्या अमूल डेअरीत बिलीन करण्याचा डाव असल्याच आरोप संजय राऊत यांनी केला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी दुग्ध महासंघाची आर्थिक स्थिती खराब असल्याचा हवाला देत महानंद दूध प्रकल्प राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाकडे देण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला जात आहे. एनडीबीबीकडे प्रकल्प सोपवण्याआधी महानंदतल्या कर्मचाऱ्यांना कामावरुन काढलं जाईल, असा आरोपही करण्यात आलाय. महानंद दूध प्रकल्पासाठी सध्यस्थितीत जवळपास 940 कर्मचारी काम करतात. इतक्या कर्मचाऱ्यांचा वेतनाचा आर्थिक भार वाचवण्यासाठी एनडीडीबीकडून जवळपास 450 कर्मचाऱ्यांची कटोती केली जाईल असंही सांगितलं जात आहे.

## जितेंद्र आव्हाडांच्या घरासमोर आरतीचा प्रयत्न; आव्हाडांची अजित पवारांवर शेलक्या शब्दात टीका

**■ ठाणे। अनिकेत भंकाळ,**



शिर्डीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार जितेंद्र आव्हाड यांनी श्रीरामाबद्दल केलेल्या एका वादग्रस्त विधानावरुन अजित पवार गट आक्रमक झाल्याचा पहायला मिळाला.

या वक्तव्याविरोधात अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी आव्हाडांच्या घरासमोर जय श्रीरामच्या घोषणा देत आरती करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, या घटनेनंतर जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांवर शेलक्या शब्दात टीका केली. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर पोस्ट करत आव्हाड म्हणाले की, माज्या घरावर आता अजित पवार यांच्या चार समर्थकांनी आरती करण्याचा प्रयत्न केला. मोजून चारच जण होते. श्री रामाचा इतिहास माहित नसलेल्या औलादींना श्री रामाचा इतिहास समजून सांगावा लागेल. श्री रामाने वनवास केवळएवढ्याचसाठी स्वीकारला होता की, त्यांच्या आईवडिलांमध्ये जे आपापसात ठरले होते, त्यामुळे भरत यांना म्हणजेच आपल्या बंधूला सिंहासन देण्यासाठी चौदा वर्षे वनवास भोगला. पण, सम्राट भरत यांनी श्री रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून राज्यकारभार केला. इथे आताच्या यांच्या इतिहासामध्ये यांच्या बापाने आपल्या काकाला म्हणजेच बापाला घराच्या बाहेर ढकलून वनवासाला पाठवायला निघालेत.

## नवी मुंबईमधील १२९ वीजचोरांवर गुन्हे दाखल

**■नवी मुंबई । भावना जैन,**



घणसोलीमध्ये वीजगळती मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले होते. महावितरण अधिकाऱ्यांनी वीजचोरीविरोधात विशेष मोहीम राबविली. १७५ प्रकरणांमध्ये ९० लाख रुपयांची वीजचोरी उघड झाली आहे. या प्रकरणी १२९ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. वीजचोरीला आळा घालण्यासाठी भांडूप परिमंडळचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी मोहीम राबविण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या होत्या.

वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांनी वाशी व नेरूळ विभागाच्या माध्यमातून संयुक्त मोहीम राबविली होती. कलम १३५ अंतर्गत १४६ प्रकरणे उघडकीस आणली असून ७७ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे निदर्शनास आले. कलम १२६ अंतर्गत २६ प्रकरणे उघकीस आणली असून १२ लाख ९५ हजार रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली. ग्राहकांनी प्रथमीच वीजचोरी केली असल्यास कायद्याने सदर गुन्हा कंपाऊंडींग करण्याची सोय आहे. वीजचोरीचे बील व कंपाऊंडींग रक्कम न भरलेल्या ग्राहकावर वीजकायदा २००३ कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करता येतो.

## अन् ते चक्क पोलिसांनाच गेले बनावट खडे विकायला...

**■मुंबई । दिगंबर जाधव,**



किंमती खडयांची विक्री करण्याच्या बहाण्याने नागरिकांची कोट्यवधींची फसवणूक करणाऱ्या टोळीला बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून बनावट खडेही जप्त करण्यात आले. पोलिसांनी ग्राहक बनून टोळीशी संपर्क साधून त्यांना जाळ्यात ओढले.

मागील काही दिवसांपासून किंमती खड़े विक्री करण्याच्या बहाण्याने फसवणुक करणारी एक टोळी मुंबईत सक्रीय असल्याची माहिती पोलीस उप आयुक्त प्रशांत कदम यांना मिळाली होती. ही टोळी २ तारखेला दादर रेल्वे स्टेशन परिसरातील स्वामी नारायण मंदिराजवळ वावरत असल्याचे समजताच माटुंगा पोलीस ठाण्याच्या पथकाने ग्राहक बनून टोळीला जाळ्यात ओढले. आरोपींनी पोलिसांच्या हाती किंमती खडे देत व्यवहार सुरू केला. पोलिसांनी सापळा रचून सहा जणांना अटक केली.

पालघरच्या संजुर हबीब खान (५८), जितेंद्रकुमार मिश्रीलाल ब्राम्हण (५०, राजस्थान ), प्रकाश हरकिशनदास टेलर (४९, सुरत), मुंबईतील शैलेश सुभाष चव्हाण (४५ ), भालचंद्र पोपट तिलोर उर्फ दिपेश( ४७) आणि मोहंमद इरफान अब्दुल कय्युम शेख (४३) याला अटक करण्यात आली आहे.

## ड्रायव्हरची लायकी काढणाऱ्या कलेक्टरला 24 तासांत पदावरून हटवलं, मुख्यमंत्र्यांची अधिकाऱ्यांना नीट वागण्याची तंबी

**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,**



कलेक्टर किशोर कन्याल यांना 24 तासांमध्ये पदावरून हटवण्यात आलं आहे. मध्य प्रदेशातील शाजापूरमध्ये ड्रायव्हरची लायकी विचारणाऱ्या कलेक्टर किशोर कन्याल यांच्यावर कारवाई करण्यात आली.

अनेकदा आपल्या हाती अधिकार आले तर तो अधिकारी वा राजकारणी व्यक्ती सर्वसामान्य लोकांना तुच्छ समजून त्याची लायकी काढतात, त्यांना सार्वजनिक ठिकाणी अपमानित करण्याची संधीही सोडत नाही. मध्य प्रदेशमधील अशाच एका कलेक्टरने एका ड्रायव्हरला त्याची लायकी विचारली आणि अपमानित केलं. पण हे कृत्य त्या कलेक्टरला चांगलंच महागात पडल्यांच दिसून आलं. शाजापूरचे कलेक्टर किशोर कन्याल यांना 24 तासांमध्ये पदावरून हटवण्यात आलं आहे. मध्य प्रदेशातील शाजापूरमध्ये ड्रायव्हरची लायकी विचारणाऱ्या कलेक्टर किशोर कन्याल यांच्यावर कारवाई करण्यात आली. या प्रकरणाची स्वतः मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांनी दखल घेत त्यांना पदावरून हटवले. त्यांना पदावरून हटवण्यासोबतच मुख्यमंत्र्यांनी ते स्वतः गरिबांचे पुत्र असून हे सरकार गरिबांचे असल्याचे सांगितले. या सरकारमध्ये सर्वांचा सन्मान झाला पाहिजे. यासोबतच त्यांनी राज्यातील उर्वरित अधिकाऱ्यांनाही त्यांच्या भाषेवर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

आंदोलन करणाऱ्या ट्रक चालकाला खडसावलं

किशोर कन्याल यांना पदावरून हटवल्यानंतर मध्य प्रदेश सरकारने रिजू बाफना यांना शाजापूरचे जिल्हाधिकारी बनवले आहे. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या ट्रक चालकांच्या संपादरम्यान जिल्हाधिकारी किशोर कन्याल यांनी शाजापूरमध्ये एका ट्रक चालकाला खडसावले होते. या घटनेचा एक व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये जिल्हाधिकारी किशोर कन्याल ड्रायव्हरशी गैरवर्तन करताना दिसत होते.

## बनावट तूप बनवणाऱ्या कारखान्यावर कारवाई करणारा अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**■ठाणे। विशाल पाटील,**



कर आकारणीसाठी लाच स्वीकारणाऱ्या पालिकेच्या सहाय्यक आयुक्तासह तिघांना अटक करण्यात आली आहे. भिवंडी महानगरपालिकेच्या कर मूल्यांकन विभागाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त सुदाम जाधव यांसह विभागातील कार्यालयीन अधिक्षिका सायरा बानो अन्सारी, प्रभारी लिपिक किशोर केणे या तिघांना दीड लाख रुपयांची लाच स्वीकारताना नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईने पालिका अधिकारी कर्मचारी यांच्यात खळबळ उडाली आहे. या कारवाईत आणखी काही जण अडकण्याची शक्यता वर्तविली जात आहे. विशेष म्हणजे सुदाम जाधव यांनी एक दिवसाआधीच बनावट तूप बनविण्याच्या कारखान्यावर कारवाई केली होती. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील नागाव येथील एका विकसित केलेल्या 13800 चौरस फूट क्षेत्रफळाचे मालमत्तेवर कर आकारणी करण्यासाठी तक्रारदाराने पालिका कर मूल्यांकन विभागात अर्ज दाखल केला होता.

# शहराचे कारभारी पाठविणारे तुम्ही कोण? गणेश नाईकांच्या प्रश्नामुळे नवी मुंबईतील सत्तासंघर्ष उघड



**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**
राज्य सरकारकडून महापालिकेत प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संख्येविषयी थेट प्रश्न उपस्थित करताना आमच्या शहराचे कारभारी पाठविणारे तुम्ही कोण असा थेट सवाल केला. गेली ४० वर्षे आम्ही या शहराची सेवा करतो. आमच्या शहरात काय घडावे हे ठरविणारे तुम्ही कोण असा सवाल करताना गणेश नाईक यांनी अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच लक्ष्य केल्याची चर्चा आता रंगली आहे. वाशीतील भावे नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महाविकास आघाडीचे सरकार अस्तित्वात आल्यापासून विरोधकाच्या भूमिकेत शिरलेले नवी मुंबईतील भाजपचे नेते आणि माजी मंत्री गणेश नाईक यांनी राज्यातील नव्या सत्ता बदलानंतरही संघर्षाची आपली भूमिका कायम ठेवली असून नवी मुंबई महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात नाईकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारीत येणाऱ्या नगरविकास विभागाच्या काही निर्णयांवर अप्रत्यक्षपणे सवाल उपस्थित केल्याने ठाणे आणि नवी मुंबईतील हा सत्तासंघर्ष अजूनही कायम असल्याची चर्चा येथील राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांवर प्रश्नांची सरबत्ती करत असताना नाईकांनी यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दोष नाही अशी सारवासारवही केली, मात्र त्यांच्या प्रश्नांचा रोख थेट नगरविकास विभागावर असल्याने हा छुपा संघर्ष मात्र लपून राहिला नाही.

अधिकाऱ्यांची नियुक्ती करताना भान ठेवा

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार अस्तित्वात आल्यापासून अजब फतवे निघू लागले. नवी मुंबई महापालिकेत एकेकाळी अर्धे अधिकारी हे प्रतिनियुक्तीवर असायचे तर अर्धे हे कायम सेवेतील असायचे. महापालिकेत कायम असलेल्या अधिकाऱ्यांना शहराची खडानखडा माहिती असते. २०१९ नंतर मात्र अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांचे हे प्रमाण पाळले गेले नाही.

# वाघोलीत शाळकरी मुलीचा वडिलांकडून खून




**■पुणे। प्रतिनिधी,**
नगर रस्त्यावरील वाघोलीमध्ये शाळकरी मुलीचा वडिलांनीच कुऱ्हाडीने वार करून खून केल्याची घटना घडली.

घटनेनंतर वडील पसार झाले असून, त्यांच्याविरुद्ध लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कौटुंबिक वादातून वडिलांनी मुलीचा खून केल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. अक्षता फकिरा दुपारगुडे (वय १५, सध्या रा. वाघोली, मूळ रा. सोलापूर) असे खून झालेल्या मुलीचे नाव आहे.

उपचारासाठी तिला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिच्या काकाने याबाबत पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. अक्षताचे वडील बांधकाम मजूर आहेत. आई गृहिणी आहे. ती वाघोलीतील एका शाळेत शिकते. अक्षताची आई घरकामासाठी सकाळी बाहेर पडली. त्यावेळी वडिलांनी तिच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. रागाच्या भरात वडिलांनी तिच्यावर कुऱ्हाडीने वार केले. या घटनेत ती गंभीर जखमी झाली होती.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर नातेवाईक आणि रहिवाशांनी तिला तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजित काइंगडे यांनी घटनास्थळी भेट दिली. मुलीचा खून करून वडील पसार झाले. त्यांच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. लोणीकंद पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# घरफोडी करणाऱ्या चोराचा दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला




**■मुंबई। प्रतिनिधी,**
घरफोडी करण्यासाठी घरात घुसलेल्या चोराने दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना बुधवारी पहाटे गोवंडी परिसरात घडली. याप्रकरणी गोवंडी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

गोवंडी गावात बुधवारी पहाटे २ च्या सुमारास ही घटना घडली. गोवंडी गावात वास्तव्यास असलेल्या ऐश्वर्या पिसे कुटुंबियांसोबत घरात निद्रीस्त होत्या. अचानक त्यांच्या घरात एक चोर शिरला. ही बाब ऐश्वर्या यांच्या लक्षात येताच त्यांनी पतीला उठवले आणि घरात चोर शिरल्याची माहिती दिली. याच वेळी चोराने या पिसे दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला केला. त्यात पिसे दाम्पत्य गंभीर जखमी झाले.

ऐश्वर्या यांनी आरडाओरडा केल्यानंतर शेजाऱ्यांनी त्यांच्या घराकडे धाव घेतली आणि आरोपीला पकडले. त्यानंतर त्याला गोवंडी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. गोवंडी पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल करून आरोपी अरविंद देशमुखला अटक केली.

# भूभाड्याच्या बनावट पावतीद्वारे म्हाडाच्या रहिवाशांची फसवणूक; म्हाडाच्या मुंबई मंडळातील कर्मचाऱ्याचा प्रताप




**■मुंबई। प्रतिनिधी,**
म्हाडाच्या कोकण मंडळातील एका भाडेवसुलीकाराने वसूल केलेली सेवाशुल्काची रक्कम म्हाडाच्या तिजोरीत जमा न करता परस्पर लाटल्याचे प्रकरण ताजे असतानाच आता मुंबई मंडळातील एका कर्मचाऱ्याने केलेला अपहार निदर्शनास आला आहे. मुंबई मंडळाच्या जागतिक बँक प्रकल्पातील भाडेवसुलीकाराने भूभाड्याची बनावट पावती पुस्तिका तयार करून रहिवाशांकडून शुल्कापोटी वसूल केलेल्या लाखो रुपयांच्या रकमेचा अपहार केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी जागतिक बँक प्रकल्पातील मिळकत व्यवस्थापकाने बोरिवली पोलीस ठाण्यात पोलीस तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीनुसार संबंधित कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून मुंबई मंडळाने या कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे.

जागतिक बँक प्रकल्पाअंतर्गत आकुर्ला, चारकोप, कांदिवली, गोराई, मालवणी, मुलुंड आदी ठिकाणी वसाहती आहेत. या वसाहतीतील रहिवाशांकडून भूभाडे वसूल करण्याची जबाबदारी भाडे वसुलीकारावर सोपविण्यात आली आहे. भाडेवसुलीकार बाबू बालान्ना म्यातरी भूभाडे वसुलीचे काम करीत होता. म्यातरीने भूभाडे वसूल केल्यानंतर दिलेल्या पावत्या बनावट असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर याप्रकरणी चौकशी केली असता म्यातरी मागील काही वर्षांपासून भूभाड्याच्या बनावट पावत्या देऊन रहिवाशांकडून अतिरिक्त भूभाडे वसूल करीत असल्याचे निदर्शनास आले. बनावट पावत्या देऊन त्याने म्हाडा आणि रहिवाशांची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. यानंतर पुढील प्रक्रिया पूर्ण करून म्यातरीविरोधात बोरिवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती जागतिक बँक प्रकल्पातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पोलीस करीत आहेत. या कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले असून लवकरच त्याच्याविरोधात बडतर्फीची कारवाई करण्यात येणार असल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले.

बनावट पावत्याच्या आधारे अनेक रहिवाशांकडून भूभाडे वसूल करण्यात आले आहे. आपली भूभाडे पावती बनावट असेल तर पुढे काय असा प्रश्न या रहिवाशांना पडला आहे. पावती बनावट असल्याचे आढळल्यास आर्थिक भुर्दंड सोसावा लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# मुंबईतील चित्रपटगृहे, नाट्यगृहे यांच्या रंगभूमी करात वाढ; राज्य सरकारच्या मंजुरीनंतर अंमलबजावणी




**■मुंबई। प्रतिनिधी,**
मुंबईतील चित्रपटगृहे, नाट्यगृहे, सर्कस, आनंदबाजार यांचे प्रयोग व खेळ यांच्यावरील रंगभूमी करात वाढ करण्याचे पालिका प्रशासनाने ठरवले आहे. गेल्या १३ वर्षांत ही करवाढ करण्यात आली नव्हती. २०२४-२५ या वर्षासाठीच हे नवीन कर प्रस्तावित करण्यात आले असून राज्य सरकारने मंजुरी दिल्यावर हे कर लागू होतील. चित्रपट, नाटक, सर्कस, आनंदबाजार यांचे प्रयोग व खेळ यांच्यावर रंगभूमी कर आकारण्याचे अधिकार मुंबई महापालिकेला आहेत. मराठी व गुजराती नाटके, चित्रपट, एकपात्री नाट्यप्रयोग, तमाशा यांना या रंगभूमीकराच्या अधिदानातून माफीची सवलत असते. २०१० मधील दरानुसार सध्या हे कर आकारले जात आहेत. त्यामुळे प्रत्येक खेळामागे ५० ते ६० रुपये आकारले जात आहेत.

या कराच्या दरात दरवर्षी १० टक्के वाढ करावी, असा प्रस्ताव महासभेत २०१५ मध्ये मंजूर झाला होता. मात्र त्याला राज्य सरकारने अद्याप मंजुरी दिली नसल्यामुळे जुनेच दर आकारले जात आहे. मात्र त्यात आता वाढ करण्याचा निर्णय करनिर्धारण व संकलक विभागाने घेतला आहे. ही करवाढ लागू झाल्यास पालिकेला वार्षिक १० कोटींचा महसूल मिळणार आहे.

# पुष्पा चित्रपटाप्रमाणे धुळे जिल्ह्यात बनावट देशी दारुची वाहतूक, तीन लाखाचा मुद्देमाल हस्तगत



**■धुळे। प्रतिनिधी,**
पुष्पा या अलु अर्जुनच्या गाजलेल्या दाक्षिणात्य चित्रपटात ज्याप्रमाणे चंदनाची वाहतूक मालवाहू वाहनातून छुप्या पध्दतीने केली जाते, त्या पद्धतीनुसार मालवाहू वाहनाच्या तळाशी चोरकप्पा तयार करून बेमालूमपणे होणारी बनावट देशी दारूची वाहतूक धुळे जिल्ह्यात पोलिसांनी उघड केली आहे.

या कारवाईत तीन लाख दोन हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून चौघा संशयितांविरुद्ध चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांना मिळालेल्या माहितीवरून जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी चाळीसगाव रस्त्यावरील जामचा मळा भागात छापा टाकून बनावट देशी दारू वाहून नेणारे वाहन पकडण्यात आले. मालवाहू वाहनाच्या तळाशी उघडझाप करणारा पत्र्याचा कप्पा बनवून त्यात संशयित नारायण माळी (रा. शिरपूर), श्रीराम बाबर, महेंद्र चौधरी (दोन्ही रा.साक्री) यांनी जवळपास ९७ हजार रुपयांची बनावट देशी दारू ठेवल्याचे आढळले. पोलिसांनी चंद्रप्रकाश पाटील (रा.पद्मनाभ नगर,मोगलाई, धुळे) याची आधी चौकशी केल्यावर ही चोरटी वाहतूक उघड झाली. कुठलेही अधिकृत कागदपत्र नसताना आणि परवाना नसताना संशयितांनी ही दारू विक्री करण्याच्या उद्देशाने वाहनात चोरून ठेवली होती.

पोलिसांनी या कारवाईत ९७ हजार रुपयांची बनावट दारू, पाच हजार रुपयांचा भ्रमणध्वनी आणि दोन लाख रुपयांचे वाहन असा तीन लाख दोन हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून चारही संशयितांविरुद्ध चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# महिला व बालकल्याण सभापती अवंतिका लेकुरवाळेंवर गुन्हा




**■नागपूर। प्रतिनिधी,**
टिप्परच्या धडकेत दोन भावंडाचा मृत्यू झाला. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण सभापती अवंतिका लेकुरवाळे, पती रमेश लेकुरवाळे, कामठी पंचायत समितीचे माजी उपसभापती आशिष मल्लेवार यांच्या नेतृत्वात ३७ कार्यकर्त्यांनी टिप्परला आग लावली, अग्निशमन दलाच्या वाहनावर दगडफेक केली आणि बेकायदेशिररित्या गर्दी जमा करण्यासह अन्य गुन्हे दाखल करण्यात आले.

२९ डिसेंबरला सकाळी बिडगावजवळ सायकलने जात असलेले सुमित नन्हेलाल सैनी (१५, रा. दुर्गानगर, पारडी) आणि बहिण अंजली सैनी (१८) यांना एका भरधाव टिप्परने धडक दिली. या धडकेत दोघेही भावंड जागीच ठार झाली. या घटनेनंतर या ठिकाणी मोठी गर्दी जमा झाली. जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी अवंतिका लेकुरवाळे यांनी स्पिकर आणि माईकवरून नागरिकांना चिथावणी दिली. नागरिकांना टिप्पर जाळण्यासाठी प्रवृत्त केले.

तसेच अग्निशमन दलाच्या जवानावर दगडफेक करीत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. त्यामुळे पोलिसांना लाठीमार करावा लागला होता. टिप्पर चालक बादशहा ठाकूर यालाही नागरिकांनी मारहाण केली होती.

# निराधार महिलेच्या डोक्यातील जखमेत अळ्या, मेडिकलमध्ये डॉक्टरांनी...



**■नागपूर। प्रतिनिधी,**
कडाक्याच्या थंडीत गणेशपेठ पोलिसांना एक ४५ वर्षीय महिला जखमी अवस्थेत आढळली. तिच्या डोक्यातील जखमेत अळ्या पडल्या होत्या. पोलिसांनी तिला मेडिकल रुग्णालयात दाखल केले. मेडिकलच्या डॉक्टरांनी तिच्यावर उपचार करत जीवदान दिले. गणेशपेठ भागात २९ ऑगस्ट २०२३ रोजी ४५ वर्षीय निराधार महिला वनवन भटकताना आढळली. तिच्या डोक्याला मोठी जखम होऊन त्यात अळ्या पडल्या होत्या. त्या जखमेतून दुर्गंधी येत होती. मेडिकलच्या शल्यक्रिया विभागाच्या आकस्मिक विभागात रुग्णावर डॉ. ब्रिजेश गुप्ता, डॉ. सुबोध, डॉ. शिखा यांनी उपचार सुरू केला.

रुग्णावर तब्बल तीन महिने उपचार झाले. माजी वैद्यकीय अधीक्षक डॉ. शरद कुचेवार यांनी स्वतः वैयक्तिक लक्ष घालून, रुग्णास भेटी देऊन उपचारास आवश्यक ती मदत पुरवली. रुग्णात हळूहळू सुधारणा होत गेली, त्यानंतर डोक्यावर प्लास्टिक सर्जरी करून उपचार करण्याकरिता प्लास्टिक सर्जरीला पाठवण्यात आले. परंतु, रुग्ण उपचारासाठी प्रतिसाद देत नव्हती. त्यावर वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे यांनी रुग्णांस स्वतः भेट देऊन समुपदेशन केले.

समाजसेवा विभागाकडून मदत

सदर रुग्णावर उपचारादरम्यान समाजसेवा विभागामार्फत सातत्याने भेटी देत बोलके करण्यात आले. रुग्णाने स्वतःचे नाव साहिबा प्रधान रा. बेलदा बाजार, जिल्हा- मेदनापूर, पश्चिम बंगाल अशी तुटक-तुटक माहिती दिली. त्या आधारावर पोलीस अधीक्षक कार्यालय मेदनापूर यांच्याशी संपर्क करून नातेवाईकांचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला. परंतु, नातेवाईक आढळले नाही. शेवटी मिशनरी ऑफ चॅरिटी मदर तेरेसाज होम, शांती भवन, काटोल रोड, नागपूर येथे रुग्णाची सोय केली गेली. अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनीही वेळोवेळी रुग्णाला मदत केली.

# प्लाझालगतचा पदपथ पुन्हा अस्वच्छ; घनकचरा विभागाची भाजी विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई



**■मुंबई। प्रतिनिधी,**
मुंबई महानगरपालिकेच्या जी उत्तर विभागाने दादरमधील प्लाझा चित्रपटगृहालगतच्या पदपथावर स्वच्छता मोहीम राबविली होती. मात्र दुसऱ्याच दिवशी पुन्हा एकदा या पदपथावर भाज्यांच्या कचऱ्याचा खच पडला आणि मातीमुळे पादचाऱ्यांना चिखल तुडवत वाट काढावी लागली. त्यामुळे जी उत्तर विभागामधील घन कचरा व्यवस्थापन विभागातील अधिकाऱ्यांनी येथील भाजी विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे.

एका दिवसात कारवाईदरम्यान २६ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच पदपथ अस्वच्छ करणाऱ्या भाजीविक्रेत्यां समज देण्यात आली.

दादर पश्चिम परिसरात लोकमान्य टिळक पूल जिथे उतरतो तिथे कोतवाल उद्यानाच्या आजूबाजूला आणि प्लाझा चित्रपटगृहालगतच्या पदपथावर दररोज भाज्यांचा कचरा, भाज्यांच्या मुळांना लागलेली माती पडलेली असते. दादरच्या बाजारातील भाजी विक्रेते रोज सकाळी बाहेरगावाहून येणाऱ्या भाज्या इथे उतरवून घेतात. त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याला व अस्वच्छतेला आळा घालण्यासाठी पालिकेच्या जी उत्तर विभागाने दोनच दिवसांपूर्वी एक मोहीम हाती घेतली होती. त्यात भाजी विक्रेत्यांनाही समाविष्ट करून घेतले होते. तसेच त्यांना स्वच्छतेविषयी जाणीव व जागरूक करण्याची अनोखी मोहीम राबविण्यात आली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार पालिका प्रशासनाने सध्या मोठ्या प्रमाणावर मुंबईत स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. मुंबईत विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून जी उत्तर विभागाने दादरच्या प्लाझा परिसरात एक मोठी मोहीम हाती घेतली होती.

दादर स्थानक परिसर भाजी आणि फूल विक्रेत्यांसाठी मोठा बाजार आहे. रोज पहाटे या ठिकाणी मुंबईच्या बाहेरून मोठ्या प्रमाणावर घाऊक प्रमाणावर भाज्या आणि फूले आणली जातात. लहान व्यापारी ते विकत घेतात आणि ठिकठिकाणी नेऊन विकतात. भाज्यांच्या उतरवताना होणारा कचरा, माती यामुळे स्थानकाजवळचे रस्ते विशेषतः प्लाझा येथे टिळक पुलाच्या पदपथावर जाड चिखलाचे थर साठतात.

# पुणेकरांना खुशखबर! मेट्रो लवकरच रामवाडीपर्यंत धावणार



**■पुणे। प्रतिनिधी,**
पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील सेवा मागील वर्षाच्या अखेरीस सुरू होणे अपेक्षित होते. परंतु, त्यासाठी आता नवीन वर्ष उजाडले आहे. या मार्गाचे काम पूर्ण होत आले असून, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे पथक या आठवड्यात तपासणीसाठी येत आहे. या पथकाकडून आठवडाभर या मार्गाची तपासणी होणार आहे. त्यानंतर खुद्द आयुक्त येऊन पाहणी करणार आहेत.

मागील वर्षाच्या अखेरीस रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाची मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तपासणी आणि त्यांची मंजुरी घेण्याचा महामेट्रोचा प्रयत्न होता. या गोष्टी मागील वर्षात पूर्ण करून नवीन वर्षाच्या सुरुवातीला विस्तारित मार्ग सुरू करण्याचे महामेट्रोचे नियोजन होते. मात्र, या मार्गावरील येरवडा स्थानकाचे जिने नगर रस्त्यावर येत होते. महामेट्रोकडून या जिन्यांसाठी खांब उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, स्थानिक नागरिकांनी वाहतूककोंडी होत असल्याने या कामाला विरोध केला. अखेर महापालिकेने हे जिने दुसरीकडे हलविण्यास महामेट्रोला सांगितले.

महापालिकेने सांगितल्यानुसार महामेट्रोने येरवडा स्थानकाच्या प्रवेशद्वाराच्या रचनेत काही बदल केले. या बदलामुळे येरवडा स्थानकाच्या जिन्याचे काही खांब पाडण्याची वेळ महामेट्रोवर आली. आता ते नव्याने उभारण्यात येत आहेत. यामुळे मेट्रोकडून काम पूर्ण होण्यास विलंब झाला. आता काम पूर्ण होत आले असून, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे पथक या आठवड्यात पुण्यात दाखल होत आहे. पथक विस्तारित मार्गाची आठवडाभर तपासणी करणार आहे. या पथकाकडून आयुक्तांकडे अहवाल सादर केला जाईल. त्यानंतर आयुक्त प्रत्यक्ष येऊन या मार्गाची तपासणी करतील. आयुक्तांनी या मार्गाला हिरवा कंदील दिल्यानंतर महामेट्रोकडून मार्ग सुरू करण्याबाबत राज्य सरकारला पत्रव्यवहार केला जाईल. त्यानंतर राज्य सरकार मार्ग सुरू करण्याचा अंतिम निर्णय घेईल, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली.

स्वारगेटपर्यंतच्या टप्प्याला विलंब

जिल्हा न्यायालय ते स्वारगेट हा भुयारी मार्ग आहे. या मार्गावर बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट ही तीन स्थानके आहे. या मार्गाचे काम पूर्ण झाले असले तरी तिन्ही स्थानकांचे काम सध्या सुरू आहे. ही स्थानके भुयारी असल्याने त्यांच्या कामाला विलंब लागत आहे. हे काम मार्चअखेरपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# भिवंडीत कत्तल केलेल्या म्हैस आणि रेड्याच्या चरबीपासून बनावट तूप



**■ठाणे। प्रतिनिधी,**
भिवंडीत कत्तल केलेल्या म्हैशी आणि रेड्यांचे अवशेष आणून त्यामधील चरबी वितळवून बनावट तूप बनविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हे तूप मोठ्या खानावळी, उपाहारगृहांना विक्री केला जात होता. महापालिकेने बनावट तुपाचे १५ किलो वजनाचे २० डबे आणि कढई असे साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती भिवंडी महापालिका प्रशासनाने दिली. भिवंडी येथील भोईवाडा भागात इदगाह साल्टर हाऊस हा बंद कत्तलखाना आहे.

या कत्तलखान्यात कापण्यात आलेले म्हैस आणि रेड्यांचे उरलेले अवशेष टाकले जाते. हे अवशेष गोळा करून त्यामधील चरबी काढून ती सुकविली जात होती. तसेच त्यापासून तूप बनविले जात असल्याच्या तक्रारी भिवंडी महापालिका प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. या माहितीच्या आधारे, महापालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या आदेशाने पर्यावरण विभागाचे नियंत्रण अधिकारी सुदाम जाधव यांचे पथक आणि आपत्कालीन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाड मारली.

कारवाई दरम्यान तेथे तूप कढविण्याची भट्टी सुरू असल्याचे आढळून आले. पालिका कर्मचाऱ्यांनी कढई मधील साहित्य ओतले. तसेच बनावट तुपाचे १५ किलो वजनाचे २० डबे आणि कढई असे साहित्य जप्त केले आहे.

# नांदगाव तालुक्यात शस्त्रांसह तिघे ताब्यात



**■नाशिक। प्रतिनिधी,**
शस्त्रसाठा घेऊन फिरणाऱ्या तीन जणांविरुध्द नांदगाव पोलिसांनी कारवाई करुन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. नांदगाव तालुक्यातील कोंढार शिवारात संशयितरित्या एक वाहन फिरत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी यांना मिळाली असता चौधरी पथकासह रवाना झाले. पोलिसांनी संशयित वाहनाचा पाठलाग करून कोंढार शिवारात ते अडवले. वाहनाची झडती घेतली असता बंदूक, २३ जिवंत पितळी राऊंड, दोन रिकाम्या पुंगळ्या, कोयते, चाकू, कुऱ्हाड, दुर्बीण, सर्चलाईट आदी साहित्य आढळून आले. संशयितांना ताब्यात घेऊन तपास करण्यात आला. तपासात संशयितांच्या घरीदेखील हत्यारे असल्याचे समजले. निरीक्षक चौधरी यांनी मालेगाव येथे संशयितांच्या घरांची झडती घेतली असता, छऱ्याची बंदूक आणि इतर हत्यारे सापडले. शेख इरफान, अफजल अहमद, अन्सारी मोहंमद या तिघांविरुध्द नांदगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यात सोनसाखळी चोरणारी टोळी गजाआड



**■पुणे। प्रतिनिधी,**
भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यात आंबेडकरी चळवळीतील अनुयायांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरणाऱ्या टोळीला लोणीकंद पोलिसांनी गजाआड केले. याप्रकरणी पोलिसांनी महिलेसह सात जणांना अटक केली आहे.

अरुणा किशन गायकवाड (वय ४०, रा. नुराणी गल्ली, ता. जामखेड, जि. अहमदनगर), ऋषीकेश बंडू जाधव (वय २२, रा. गांधीनगर, नूर कॉलनी, बीड), अनिल उत्तम पवार (वय २२, रा. नवगण राजुरी, जि. बीड), सचिन श्रीमंत गुंजाळ (वय ३५, रा. खडक देवळा, जि. बीड), शंकर सर्जेराव गायकवाड (वय ३४, रा. नाळवंडी नाका, जि. बीड), मिलिंद वसंत शिंदे (वय २०, रा. शताब्दीनगर, छत्रपती संभाजीनगर), नितेश रमेशराव बोंघणकर (वय ३४, रा. पिंपळगाव, जि. अमरावती) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी सोमवारी (१ जानेवारी) राज्यभरातून आंबेडकरी चळवळीतील अनुयायांनी गर्दी केली होती. पेरणे फाटा परिसरात बसमध्ये प्रवेश करणाऱ्या अनुयायांच्या गळ्यातील दागिने चोरीला गेल्याच्या तक्रारी पोलिसांकडे आल्या होत्या. पोलिसांनी तपास करून सातजणांना अटक केली. न्यायालयाने आरोपींना शुक्रवारपर्यंत (५ जानेवारी) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक रवींद्र गोडसे, गजानन जाधव, शिरीष भालेराव यांनी ही कारवाई केली.